दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

प्रतिनिधी नेमणे आहे
लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● गुरुवार दि.३१ जुलै २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २४५ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Thrusday 31 July 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 245 ● Pages 4 ● Rate 4 Rs


# सोमनाथ सूर्यवंशी यांची हत्या करणाऱ्या पोलिसांवर गुन्हे दाखल करण्याचे सुप्रीम कोर्टाचे आदेश !

**मुंबई (वृत्तसंस्था)**–परभणी जिल्ह्यातील सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणी उच्च न्यायालयाने पोलिस अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले होते. आता सर्वोच्च न्यायालयाने देखील या प्रकरणात उच्च न्यायालयाचा आदेश कायम ठेवला असल्याची माहिती ड. प्रकाश आंबेडकर यांनी दिली आहे. या संदर्भात प्रकाश आंबेडकर स्वतः बाजू मांडत आहेत.या संदर्भात प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले की, महाराष्ट्र राज्य आणि इतर विरुद्ध विजयबाई वेंकट सूर्यवंशी या खटल्यात माननीय सर्वोच्च न्यायालयाने आमच्या बाजूने निकाल दिला आहे आणि उच्च न्यायालयाचा आदेश कायम ठेवला आहे.परभणी येथील संविधान शिल्प विटंबना प्रकरणी आंदोलन करणाऱ्या सोमनाथ सूर्यवंशी यांचा न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाल्या प्रकरणी उच्च न्यायालयात याचिकेवर सुनावणी झाली होती. या प्रकरणात आता पोलिसांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले होते. सुरुवातीला हा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाल्याचे सांगण्यात आले होते. परंतु, त्याच्या शवविच्छेदन अहवालात मारहाणीमुळे मृत्यू झाल्याचे समोर आले होते. या प्रकरणात आता पोलिसांच्या अडचणी वाढल्या आहेत.
परभणी हिंसाचार प्रकरणात पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या सोमनाथ सूर्यवंशीचा १६ डिसेंबर २०२४ रोजी न्यायालयीन कोठडीत असताना मृत्यू झाला होता. सुरुवातीला हा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाल्याचे सांगण्यात आले होते. परंतु, त्याच्या शवविच्छेदन अहवालात मारहाणीमुळे मृत्यू झाल्याचे समोर आले होते. तसेच सोमनाथचा मृत्यू मारहाणीत झाल्याचे न्यायदंडाधिकाऱ्यांच्या अहवालात म्हटले आहे. सोमनाथच्या मृत्यूला पोलिस जबाबदार असल्याचेही अहवालातून पुढे आले आहे. आता या प्रकरणाचा तपास सीआयडीकडून करण्यात येणार आहे. त्यामुळे या प्रकरणात आरोपींवर हत्येचा गुन्हा दाखल करण्याची शक्यता वर्तवली जात होतीच. सोमनाथ सूर्यवंशींच्या कुटुंबीयांनी न्यायाची मागणी करत याचिका दाखल केली आहे. यात कुटुंबीयांची बाजू वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर हे मांडत आहेत.



परभणी हिंसाचार प्रकरणात न्यायालयीन कोठडीत असलेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूने संपूर्ण राज्य हादरून गेले होते. सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांनी आरोप केला होता की, त्यांचा मृत्यू पोलिसांनी केलेल्या अमानुष मारहाणीमुळे झाला. प्राथमिक शवविच्छेदन अहवालात सोमनाथ सूर्यवंशी (३५) यांचा मृत्यू मारहाणीमुळे झाल्याचे उघड झाल्यानंतर, परभणीमध्ये एका पोलिस अधिकाऱ्यासह २ पोलिसांना निलंबित करण्यात आले होते. घटनेच्या सुमारे दोन महिन्यांनंतर ही कारवाई करण्यात आली होती.
मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने सोमनाथ सूर्यवंशी हत्येप्रकरणी एका आठवड्याच्या आत पोलिसांवर एफआयआर दाखल करण्याचा स्पष्ट आदेश दिला होता. मात्र, आजपर्यंत तो एफआयआर दाखल झालेला नाही. त्यामुळे आता पोलीस आणि प्रशासनवर कोर्टाच्या अवमानाच्या (Contempt of Court) अंतर्गत कारवाई होते का? हे पाहणं महत्त्वाचं आहे.
आजच्या सुनावणी दरम्यान सर्वोच्च न्यायालयालाही याची माहिती देण्यात आली होती आणि त्यांनी विचारलं होतं की, अद्याप एफआयआर का दाखल झाला नाही? या प्रकरणात राज्य शासनच आरोपी आहे. सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू राज्याच्या ताब्यात असताना झाला. त्यामुळे शासनाने नेहमीप्रमाणे हात झटकण्याचा प्रयत्न केला. सुरुवातीला राज्य सरकारने हा मृत्यू न्यायालयीन कोठडीत झाला आहे असं सांगितलं, परंतु पोस्टमार्टममध्ये मल्टिपल इंज्युरीमुळे मृत्यू झाल्याचं स्पष्ट झालं आहे.पोस्टमोर्टम रिपोर्टच्या सेकंड ओपिनियनसाठी कोर्टाची पूर्वपरवानगी लागते. जे.जे. हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी पूर्व परवानगी न घेता ते केले, त्यामुळे त्या डॉक्टरांनाही आरोपी करावं, असा अर्ज आम्ही कोर्टात करणार आहोत.१९६ BNS किंवा १७४ CRPC या कायद्यातील तरतुदी अपूर्ण आहेत. न्यायालयीन मृत्यू झाल्यानंतर त्याचा चौकशी अहवाल आल्यावर पुढे काय कारवाई करावी, या संदर्भात कायद्यात तरतूद नाहीये. यावर हायकोर्ट गाईडलाईन्स ठरवणार असून त्यानंतर एसआयटी स्थापनेसंबंधी किंवा चौकशी अधिकार्या संबंधी निर्णय घेतला जाईल.परभणीतील कोम्बिंग ऑपरेशनवर न्यायालयाने नोंद घेतलेली आहे. तोही आता चौकशीचा भाग होईल. त्या ऑपरेशनमध्ये सहभागी अधिकाऱ्यांवरही गुन्हा दाखल होऊ शकतो. गुन्हा दाखल करण्याच्या उच्च न्यायालयाच्या आदेशाविरोधात राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात अपील केलं होतं. ते सर्वोच्च न्यायालयाने फेटाळलं आहे. त्यामुळे एफआयआर दाखल करणे बंधनकारक आहे.

# बदामराव पंडितांच्या उपस्थितीत आज खांडवीत सेवापूर्ती गौरव सोहळा

## अर्जुन धुमाळ, महादेव डोंगरे यांचा होणार सत्कार

**गेवराई । प्रतिनिधी**
गेवराई तालुक्यातील शोभादेवी महिला सेवाभावी संस्था संचलित अहिल्याबाई होळकर विद्यालय खांडवी येथे कार्यरत असलेले अर्जुन माणिकराव धुमाळ आणि महादेव रुस्तुमराव डोंगरे या दोन्ही विद्यार्थीप्रिय शिक्षकांच्या सेवापुर्ती गौरव सोहळ्याचे आज खांडवी येथे आयोजन करण्यात आले असून शिवसेना नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या हस्ते दोघांचाही हृदयसत्कार करण्यात येणार आहे.





अहिल्याबाई होळकर विद्यालय खांडवी येथे शिक्षक म्हणून कार्यरत असलेले अर्जुन माणिकराव धुमाळ हे राक्षसभुवन शनीचे येथील रहिवासी असून महादेव रुस्तुमराव डोंगरे हे काजळा येथील रहिवासी आहेत. दोघांनीही वयाची ५८ वर्ष पूर्ण केल्याने त्यांच्या शिक्षक म्हणून सेवापूर्ती कृतज्ञता सोहळ्याचे आज दिनांक ३१ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता अहिल्याबाई होळकर विद्यालय खांडवी येथे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, शोभादेवी महिला सेवाभावी संस्थेच्या अध्यक्ष सौ गिरीकाभाभी पंडित, जिल्हा परिषदचे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजीत पंडित, शोभादेवी महिला सेवाभावी संस्थेच्या सचिव सौ अनुरूपाताई पंडित, युवानेते रोहित पंडित, युवानेते यशराज पंडित, निवृत्त अधीक्षक अभियंता परिमंडळ पुणे बी एन बहिर, समाज कल्याण अधिकारी पुणे राधाकिसन देवडे, रवींद्र सुपेकर, इंजिनियर प्रदीप बहिर, शोभादेवी महिला सेवाभावी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी तथा मुख्याध्यापक प्रमोद देसले यांच्यासह कांतराव शिंदे, कैलास शिंदे, सरपंच गोपाळ शिंदे, चत्रपूर नाईकवाडे, भैय्या भोले, अंकुश पवार, विनायक चव्हाण, ताराचंद चव्हाण, डॉ श्याम निर्मळ, मुख्याध्यापक अमोल राजापूरकर, मुख्याध्यापक दीपक गरुड, मुख्याध्यापक जुगदार, मुख्याध्यापक अविनाश पंडित मुख्याध्यापक जे एन जाधव, मुख्याध्यापक भिलारे सर आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या सेवापूर्ती गौरव सोहळ्यास बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अहिल्याबाई होळकर विद्यालयाचे मुख्याध्यापक केशव तळेकर यांच्यासह शिक्षक व स्वागत समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# दिव्या देशमुखने बुद्धिबळात मिळवले जागतिक विजेतेपद

## भारताची मान अभिमानाने उंचावली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नागपूर (वृत्तसंस्था)**– नागपूरची कन्या आणि भारताची अतिशय प्रतिभावान बुद्धिबळपटू दिव्या देशमुख हिने जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत आपले नैपुण्य सिद्ध करत महिला जागतिक बुद्धिबळ विजेतेपद पटकावले आहे. तिच्या या ऐतिहासिक यशामुळे संपूर्ण देशात अभिमानाची लाट उसळली आहे. नागपूरकरांसाठी तर ही अभिमानाची गोष्ट असून शहराच्या बुद्धिबळ क्षेत्रातील लौकिकात मोलाची भर पडली आहे.दिव्या देशमुखने आयोजित जागतिक महिला बुद्धिबळ स्पर्धेत सर्वोच्च कामगिरी करत अत्यंत अचूक आणि रणनीतीपूर्ण खेळीद्वारे आंतरराष्ट्रीय स्तरावरील दिग्गज खेळाडूंना पराभूत केले. अंतिम फेरीत तिने रशियाच्या बलाढ्य खेळाडूवर मात करत आपली बुद्धिमत्ता, चिकाटी आणि कौशल्य सिद्ध केले.
दिव्या देशमुख ही लहानपणापासूनच बुद्धिबळात रस घेणारी खेळाडू असून, तिचे प्रशिक्षक आणि कुटुंबीयांनी तिच्या प्रवासात मोलाचे योगदान दिले आहे. वयाच्या केवळ ५ व्या वर्षी तिने बुद्धिबळ खेळायला सुरुवात केली आणि त्यानंतर अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये आपली छाप पाडली. तिने यापूर्वीही आशियाई, राष्ट्रकुल आणि विविध वयोगटांतील स्पर्धांमध्ये सुवर्णपदके मिळवून आपल्या नावावर अनेक गौरव मिळवले आहेत. मात्र, जागतिक विजेतेपद मिळवणे हे तिच्या कारकिर्दीतील सर्वोच्च शिखर मानले जात आहे.देशभरातून आणि राज्यभरातून शुभेच्छांचा वर्षाव दिव्याच्या या यशावर पंतप्रधान, राष्ट्रपती, मुख्यमंत्री, क्रीडामंत्री, विविध क्रीडा संघटना, बुद्धिबळ महासंघ तसेच अनेक सामाजिक आणि सांस्कृतिक संस्थांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री अजित पवार, यांनीही दिव्याचे अभिनंदन करत तिला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.बुद्धिबळ विकासासाठी प्रेरणास्त्रोत दिव्या देशमुखच्या या विजयामुळे महाराष्ट्रातील आणि विशेषतः नागपूरमधील तरुण बुद्धिबळपटूंना नवी प्रेरणा मिळाली आहे. तिच्या यशामुळे राज्यात बुद्धिबळाची लोकप्रियता वाढण्यास आणि नवोदित खेळाडूंना प्रोत्साहन मिळण्यास मदत होणार आहे. सरकारकडून देखील बुद्धिबळ प्रशिक्षण केंद्रांची संख्या वाढवण्यावर भर देण्यात येईल, असे देवेंद्र फडणीस म्हणाले
दिव्याची प्रतिक्रिया : हे यश माझ्या कुटुंबाच्या, प्रशिक्षकांच्या आणि संपूर्ण देशवासीयांच्या आशीर्वादामुळे शक्य झाले. मी भारतासाठी हे विजेतेपद जिंकल्याचा अभिमान वाटतो. पुढेही मी भारताचे नाव उंचावण्यासाठी प्रयत्नशील राहीन.दिव्या देशमुखने फक्त आपली बुद्धिबळ कौशल्यच नव्हे, तर कठोर मेहनत, शिस्त आणि चिकाटी यांचे मूर्तिमंत उदाहरण देशासमोर ठेवले आहे. तिचे हे यश केवळ वैयक्तिक नाही, तर देशाच्या युवा पिढीसाठी प्रेरणादायी आहे. अशा या चमकत्या ताऱ्याला पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

# वंचितअपंग व्यक्तींनी दिव्यांग शिबिराचा लाभ घ्यावा-मस्के

## गेवराई मध्ये दिव्यांग शिबिराला उस्फुर्त प्रतिसाद

**गेवराई । प्रतिनिधी**
जिल्ह्याचे खा. बजरंग (बप्पा) सोनवणे यांच्या संकल्पनेतुन सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली, भारतीय कृत्रिम अंग निर्माण, जिल्हा प्रशासन बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाभरात प्रत्येक तालुका निहाय दिव्यांग शिबिराचे आयोजन केले जात आहे. आज गेवराई येथील पंचायत समिती येथे शिबिर संपन्न झाले. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अपंग तथा दिव्यांग व्यक्तींसाठी शासनाच्या विविध योजना असून प्रत्येक अपंग व्यक्तींना योजनेचा लाभ आणि अत्यावश्यक उपकरण आणि साधन मिळाली पाहिजेत. अनेक अपंग व्यक्ती योजने पासून वंचित आहेत. यासाठी दिव्यांग शिबिराचे आयोजन केले जात आहे. दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकां साठी कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधने मोफत वाटपासाठी पूर्व तपासणी व नोंदणी करून पात्र दिव्यांगांना कृत्रिम अवयव व उपकरणाचे वाटप केले जाणार आहे.वंचित तथा गरजू अपंग व्यक्तींनी दिव्यांग शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. असे आवाहन



राष्ट्रवादी शरद पवार कॉंग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे. दिव्यांगांना शासनाच्या प्रत्येक योजनेचा फायदा मिळाला पाहिजे, नियमितपणे वेळेवर मानधन वाटप व्हावे, मानधनात वाढ करावी, दिव्यांगांच्या घरकुल कोट्यात वाढ करून जास्तीत जास्त घरकुलाचे वितरण व्हावे अशी मागणी काही दिव्यांग व्यक्तींनी यावेळी केली.

# अल्पवयीन मुलीवर लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार करणाऱ्यांना अटक करा

## अत्याचारित मुलीच्या आईचे जिल्हाधिकारी कार्यालया समोर आमरण उपोषण सुरू

**बीड । प्रतिनिधी**
अल्पवयीन मुलीवर लग्नाचे अमिष दाखवून अत्याचार करणाऱ्या मुख्य आरोपीस व त्यांना सहकार्य करणाऱ्या संशयित आरोपींना तात्काळ अटक करण्याच्या मागणीसाठी दि.३० जुलै २०२५ बुधवार पासुन बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसल्या आहेत.
दि. २८ एप्रिल २०२५ रोजी संध्याकाळी च्या वेळी ९ ते ११ दरम्यान चंदनसावरगाव ता. केज येथून कीर्तन कार्यक्रमातुन माझी मुलगी (बदललेले नाव) सुनंदा अशोक करपे वय १६ वर्षे ९ महिने १४ दिवस हिस शाम तुकाराम तपसे रा. चंदनसावरगाव ता. केज जि. बीड याने लग्नाचे अमिष दाखवून पळवून नेल्याची घटना घडली होती. याबाबत दि.२९ एप्रिल २०२५ रोजी गु.र.नं.०१२२/२०२५ भारतीय न्याय संहिता (बी.एन.स.) २०२३ कलम १३७(२) नुसार युसुफवडगाव ता. केज जि. बीड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असुन सदर प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक शेळके (पिंक पथक, वूीि कार्यालय, केज) हे करत आहेत.



गुन्हा घडल्यापासून तब्बल ४१ दिवस दि.७ जून २०२५ पर्यत आरोपी माझ्या मुलीस घेऊन इतर संशयीत आरोपीच्या सहकार्याने लातूर, मुंबई, आदी ठिकाणी आरोपी वास्तव्यास असल्याचं मुलीने जबाबात सांगितले आहे. दि.७ जून २०२५ रोजी युसफवडगाव पोलिस ठाण्यात आरोपीचे चुलते सखाराम तपसे यांनी मुलीस आणले मात्र मुख्य आरोपीस ताब्यात दिले नाही उलट त्याला पुन्हा फरार होण्यास सहकार्य केले. पोलिसांनी सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करन माझ्या मुलीस बाल न्याय मंडलाच्या आदेशानुसार बीड येथील महिला सुधार गृहात ठेवले आहे तब्बल ७७ दिवस उलटले तरी अद्यापही आरोपीचा शोध लागला नसुन या घटनेतील आरोपीचे मोबाईल नंबर, आरोपीच्या आई-वडिलांचे, बहिणीचे, मेहुण्याचे, भावाचे, चुलत भावाचे व इतर जवळच्या नातेवाईकांचे मोबाईल नंबर तपास अधिकाऱ्यांना दिले असुन तपास अधिकाऱ्यांनी अद्यापही कारवाई केली नाही. आरोपीच्या संबंधित सर्वांचे मोबाईल नंबर, कॉल रेकॉर्ड, गुगल लोकेशन्स ट्रॅक करुन तातडीने या घटनेतील सर्वच आरोपीचा शोध घेण्यात यावा पोलीस अधीक्षक बीड,अप्पर पोलीस अधीक्षक, बीड अप्पर पोलीस अधिक्षक अंबाजोगाई पोलीस उपअधीक्षक (गृह) पोलिस मुख्यालय, बीड उपविभागीय पोलिस अधिकारी, केज सहाय्यक पोलीस निरीक्षक पोलिस ठाणे, युसुफवडगाव तपास अधिकारी, पिंक पथक (वूीि) कार्यालय, केज या सर्वच अधिकाऱ्यांना अनेकदा भेटून आरोपींना अटक करण्यासाठी विनंती केली आहे. मात्र याकडे सर्वच अधिकाऱ्यांनी वेळकाढूपणा करुन जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. माझ्या मुलीच्या जीवाला व मला आरोपीकडून व त्यांच्या नातेवाईकांकडून धोका असून त्यांना अटक करुन पुढील कायदेशीर कारवाई या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ३० जुलैपासून आमरण उपोषण सुरू केले आहे.

संपादकीय

# पाच वर्तुळांचा सांगावा



जगातील सर्वांत मोठा क्रीडा महोत्सव म्हणून ओळख असलेल्या ऑलिम्पिक स्पर्धेला शुक्रवारी मध्यरात्री पॅरिसमध्ये प्रारंभ झालेला असेल. तब्बल शंभर वर्षांनी पुन्हा एकदा पॅरिसमध्ये होत असलेली स्पर्धा अनेक अर्थाने वेगळी असणार आहे. आधुनिक ऑलिम्पिक स्पर्धांचे पुनरुज्जीवन झाले, त्याला आता सव्वाशेहून अधिक वर्षे झाली. प्रारंभी पॅरिसने दोन वेळा या स्पर्धांचे यजमानपद भूषविले होते. त्यानंतर आता तब्बल एका शतकाच्या अंतराने पुन्हा एकदा फ्रान्सच्या भूमीवर जगातील सर्वच देशांतील युवक आपले क्रीडाकौशल्य पणाला लावणार आहेत. त्याचबरोबर, लंडनपाठोपाठ ही स्पर्धा तिसऱ्यांदा भरविणारे तिसरे शहर म्हणून पॅरिसची नोंद इतिहासात केली जाईल. आत्ताच्या काळात ऑलिम्पिक स्पर्धा भरविणे हे फक्त क्रीडा क्षेत्रासाठी महत्त्वाचे नसते, तर संपूर्ण देशाच्या अर्थव्यवस्थेला एक नवे वळण देण्याची ताकद या स्पर्धांमध्ये असते.

पॅरिसची ही स्पर्धाही त्याला अपवाद नसेल. अर्थात लंडन आणि टोकियोमध्ये झालेल्या स्पर्धांच्या तुलनेमध्ये पॅरिसच्या आयोजनावर कमी – म्हणजे साधारण सोळा अब्ज डॉलर खर्च केला जाणार आहे. लंडनमध्ये हा खर्च साडेबावीस अब्ज डॉलरपर्यंत गेला होता. एवढा निधी खर्च करणे खरोखरच आवश्यक होते का, अशी टीकाही केली गेली. गेल्या स्पर्धेला करोनाच्या ग्रहणाने ग्रासले होते. आता मात्र कोणत्याही सावटाशिवाय ही स्पर्धा होणार आहे. फ्रान्समध्ये ही स्पर्धा होत असताना त्यांच्यापुढे सर्वांत मोठे आव्हान हे आर्थिक गोष्टींपेक्षा या निमित्ताने जगभरातून येणारे दहा हजाराहून अधिक खेळाडू, पंच, संघटक व पत्रकार यांच्या सुरक्षेचे असणार आहे. गेल्या काही वर्षांत या शहराने अनेक दहशतवादी कारवायांचा सामना केला आहे. त्यामुळे या स्पर्धेच्या दरम्यान कोणतीही अनुचित घटना होऊ नये यासाठी फ्रेंच सरकारने ब्रिटनपासून ते सौदीपर्यंतच्या अनेक देशांशी करार करून सुरक्षाव्यवस्थेसाठी त्यांचे सहकार्य घेतले आहे. एखाद्या आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी असे सहकार्य घेतले जाण्याची ही बहुधा पहिलीच वेळ असावी. पॅरिसमधील सोळा वेगवेगळ्या ठिकाणी या स्पर्धा होणार आहेत. त्यातील बहुसंख्य स्टेडियम जुनी असून, या स्पर्धेच्या निमित्ताने त्यांचे डागडुजी करण्यात आली आहे. स्पर्धेसाठी क्रीडानगरी मात्र नव्याने उभी करण्यात आली आहे. या स्पर्धेच्या निमित्ताने पॅरिसमधील वाहतूक व्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदल करण्यात आले आहेत. मेट्रोच्या जाळ्यामध्ये वाढ करण्यात आली आहे; त्याचप्रमाणे शहरभर सायकल ट्रॅकचे जाळे तयार करण्यात आले आहे. त्याचा भार येणाऱ्या पाहुण्यांकडून वसूल करण्याचाही प्रयत्न आहे. त्यामुळे मेट्रोचे भाडे दुप्पट केले गेले आहे. पॅरिस हे जगातील कलासक्त शहर समजले जाते. विविध देशांतील, धर्मातील कलावंत या नगरीने आपल्याला स्वीकारावे यासाठी धडपड करताना दिसतात. आपल्या या कलाप्रेमाचे प्रतिबिंब या स्पर्धेच्या प्रारंभी होणाऱ्या समारंभात दिसावे, यासाठी संयोजकांची धडपड आहे.

या शतकाच्या शेवटपर्यंत ऑलिम्पिक स्पर्धा या भारताच्या दृष्टीने फक्त हजेरी लावण्याच्या स्पर्धा असत. हॉकीमधील काही सांघिक सुवर्णपदके सोडली तर नॉर्मन प्रिचर्ड यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात मिळविलेली दोन रौप्यपदके व त्यानंतर महाराष्ट्राच्या खाशाबा जाधव यांनी कुस्तीत मिळविलेले ब्राँझपदक एवढीच भारताची कमाई होती. अटलांटामध्ये लिएण्डर पेसने टेनिसमध्ये ब्राँझपदक मिळविताना भारतीय खेळाडू वैयक्तिक पदके मिळवू शकतात हे पुन्हा एकदा जगाला दाखवून दिले. त्यानंतर सातत्याने प्रत्येक स्पर्धेमध्ये भारतीय खेळाडू ऑलिम्पिकमध्ये पदके मिळविण्यात यशस्वी होत आहेत. अर्थात हे यश त्या खेळाडूंच्या मेहनतीचे आहेच; पण त्याचबरोबर भारतामध्ये क्रिकेटव्यतिरिक्तही इतर खेळ आहेत याची जाणीव झालेले सरकार आणि इतर प्रायोजकांनाही त्याचे श्रेय जाते. त्यांनी आपली ताकद या खेळाडूंच्या मागे उभी केली म्हणून भारत गेल्या पंचवीस वर्षांमध्ये पदकतक्त्यांमध्ये दिसू लागला आहे. अर्थात १४० कोटी लोकसंख्या असलेला देश व जगातील चौथ्या क्रमांकाची आर्थिक सत्ता असलेल्या भारताला यामध्ये आणखी खूप प्रगती करायची आहे. यंदाच्या स्पर्धेमध्ये भारताचे एकशे बारा खेळाडूंचे पथक सहभागी होत आहे. भारताला नेमबाजी, बॅडमिंटन, कुस्तीमधून पदकांच्या अपेक्षा आहेतच; पण त्याचबरोबर पुन्हा एकदा हॉकीमध्येही यशाला गवसणी घालण्याची भारताची धडपड असेल. त्याचबरोबर गेल्या स्पर्धेमध्ये सुवर्णवेध घेणाऱ्या नीरज चोप्राकडूनही भारताला सुवर्णपदकाची अपेक्षा असेल. अर्थात ऑलिंपिकच्या ब्रीदवाक्यानुसार, जिंकण्यापेक्षा सहभाग महत्त्वाचा. भारताने अनेक वर्षे हे ब्रीद अगदी मनापासून स्वीकारले होते. गेल्या काही वर्षांत बदललेल्या मानसिकतेमुळे आता नव्या भारतातील खेळाडू या स्पर्धेत काय कमाल करतात हे बघू या.

# महापुरुषांच्या जयंतीला जनआंदोलनाचे स्वरूप द्या

## ‘नेत्याच्या वर्गणीवर नव्हे, जनतेच्या सहभागावर’!



कपिल अंबादास मस्के
९४२२६६००७७
बीड जिल्हा संपादक
दैनिक वादळ वार्ता

सार्वजनिक सण, राष्ट्रीय दिवस, आणि महापुरुषांची जयंती हे सगळे कार्यक्रम लोकशाहीतील जनतेच्या भावनांचे, संस्कृतीचे आणि मूल्यांचे प्रतीक असतात. विशेषतः थोर समाजसुधारक, क्रांतिकारक, व तत्त्वज्ञ यांच्या जयंती दिवशी त्यांचे विचार, कार्य, आणि आदर्श जनतेपुढे मांडण्याची संधी असते. मात्र सध्या या कार्यक्रमांचे स्वरूप बदलत चालले आहे – एका नेत्याच्या वर्गणीवर, त्याच्या फोटोसह आणि त्याच्या संमतीशिवाय काहीही होत नाही ही बाब चिंताजनक आहे.

नेत्याचा कार्यक्रम, की जनतेचा संस्कार?

महापुरुष कोणत्याही एका पक्षाचे किंवा नेत्याचे नसतात. ते समाजाचे असतात – आणि म्हणूनच त्यांची जयंतीही सर्वसामान्य जनतेच्या सहभागातून आणि वर्गणीद्वारे साजरी व्हायला हवी. पण आज अनेक ठिकाणी असा प्रकार दिसतो की जयंती साजरी करणारा गट एखाद्या स्थानिक नेत्याची ‘वर्गणी’ घेतो आणि संपूर्ण कार्यक्रम त्याच्या नावावर रंगतो. बॅनरवर फक्त नेत्याचे चेहरे झळकतात, तर महापुरुष कोपऱ्यात असतात.

विचारांचा उत्सव ही आर्थिक सत्ता नव्हे, ही भावना आपल्याला रुजवावी लागेल. वर्गणी गोळा करून लोकांनी जयंती साजरी केली पाहिजे

जयंती ही सामूहिक जबाबदारी असावी. ज्याच्यासाठी ती साजरी केली जाते, त्याच्या विचारांप्रमाणे सामाजिक उपक्रम, चर्चासत्र, ग्रंथ वाचन, शिक्षणवाढ, स्वच्छता, आरोग्य तपासणी, अशा गोष्टी हवीत.

त्यासाठी जर निधी लागत असेल, तर तो सर्वसामान्य लोकांनी १०, २०, ५० रुपये वर्गणी स्वरूपात जमा करून पारदर्शकपणे खर्च करावा.या माध्यमातून लोकांना जाणीव होते की ही जयंती माझीही आहे, माझा यात सहभाग आहे. त्या क्षणी ती राजकीय दिखावा न राहता सांस्कृतिक समर्पण होते.

नेत्याच्या पैशावरचा कार्यक्रम म्हणजे 'शो', नव्हे 'श्रद्धा'

एकाच नेत्याच्या पैशावर, त्याच्या अनुयायांनी भरलेल्या सेल्फीबाजी कार्यक्रमाने महापुरुषांचे कार्य समजणार नाही. हे लोकशाहीच्या विरुद्ध आहे. महापुरुषांचा अपमान आहे.

आज समाजाला विचारांची गरज आहे, केवळ फलकांची नव्हे. महापुरुषांच्या मूर्तींपेक्षा त्यांच्या तत्वांचा वारसा चालवणे हे अधिक मौल्यवान आहे.

शेवटी एकच: कार्यक्रमाचा मालक कोण?

या प्रश्नाचं उत्तर स्पष्ट आहे – जयंती कोणत्याही नेत्याची मक्तेदारी नसून ती समाजाची जबाबदारी आहे.

म्हणून, महापुरुषांच्या जयंतीसाठी वर्गणी गोळा करा, जनता पुढे या, आणि खऱ्या अर्थाने त्यांचे विचार जगा.

विचार विकत घेता येत नाहीत ते फक्त पिढ्यानपिढ्या रुजवावे लागतात.

# विकसित भारतासाठीची चतु:सूत्री

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी यंदा सादर केलेल्या अर्थसंकल्पात ‘विकसित भारत’ हा शब्द वारंवार वापरण्यात आल्याचे निदर्शनास आले. व्यापारी, तसेच उद्योग वर्तुळाने या अर्थसंकल्पाचे चांगल्यापैकी स्वागत केले आहे. त्या वर्तुळातील अनेकांनी या अर्थसंकल्पास विकासाभिमुख, सर्वसमावेशक, रोजगार वाढीस उत्तेजक आदी शब्दांमध्ये गौरविले आहे. अर्थसंकल्पावरील त्यांची प्रतिक्रिया सकारात्मक अशी आहे. असे असले तरी, सन २०४७पर्यंत भारतास ‘विकसित देश’ करण्याचे जे आपले ध्येय आहे, उद्दिष्ट आहे ते साध्य करण्यासाठी या अर्थसंकल्पात नेमकी कुठली पावले उचलली आहेत, याचा अभ्यास आपण खोलात जाऊन व तपशीलात करणे गरजेचे आहे. असा अभ्यास करण्यासाठी आपण यंदाच्या अर्थसंकल्पाची प्रमुख वैशिष्ट्ये आधी लक्षात घेऊ. पायाभूत सोयींच्या निर्मितीस प्राधान्य देणे, सरकारी आणि खासगी गुंतवणुकीस उत्तेजन देणे, करांचे दर कमी करून त्यांची व्याप्ती वाढविणे–विस्तारणे, महागाईवरील नियंत्रणात वाढ करणे आदी या अर्थसंकल्पाची वैशिष्ट्ये म्हणता येतील. ही सारी वैशिष्ट्ये लक्षात घेऊन, त्या पार्श्वभूमीवर भारत ‘विकसित’ कसा होऊ शकेल तेही आता पाहू.

पायाभूत सोयी : आधुनिक आर्थिक विकासामध्ये उत्तम रस्त्यांची उपलब्धता, रेल्वेप्रवासाच्या सोयी, शक्य तेथे जलवाहतूक, विमानमार्ग, अद्ययावत टेलिफोन नेटवर्कच्या (फाइव्ह जी) सोयी, वीज व पाणी पुरवठा आदी पायाभूत सोयींचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. शेती, उद्योग यांचे उत्पादन जरी विक्रमी झाले तरी त्या उत्पादनांची बाजारात विक्री करायची म्हटले की त्यासाठी दळणवळणाच्या सोयी (पायाभूत सोयी) समाधानकारक असाव्याच लागतात. त्यास पर्याय नाही. एकवेळ उत्पादन मागे राहिले तरी चालेल, पण दळणवळणाच्या सोयी–सुविधा मात्र समाधानकारक असणे फारच गरजेचे आहे. त्यासाठी चीनचे उदाहरण डोळ्यांसमोर ठेवता येईल. पायाभूत सोयी उत्तम केल्यामुळे चीन पुढे गेला; आपण मात्र मागे. असो. पायाभूत सोयी–सुविधांच्या उभारणीसाठी अर्थसंकल्पामध्ये ११ लाख कोटी रुपयांची तरतूद आहे. गेल्या वर्षी ही तरतूद ९ लाख ५० हजार कोटी इतकी होती. यंदा एकूण राष्ट्रीय उत्पन्नापैकी ३.४ टक्के रक्कम ही पायाभूत सोयी निर्माण करणे आणि आहेत त्या अद्ययावत करणे यांसाठी वापरली जाईल. सन २०२३मध्ये पायाभूत सोयी निर्मिती निर्देशांकानुसार चीनचा क्रमांक विसावा, तर भारताचा एकतीस होता. यात पहिल्या क्रमांकावर होता जर्मनी. आता आपली परिस्थिती सुधारत आहे. परंतु आणखी सुधारणा होणे गरजेचे आहे. तशी सुधारणा झाली तर ‘विकसित भारत’ हे ध्येय समीप येईल यात शंका नाही.

गुंतवणूक : गुंतवणूक – विशेषतः यंत्रसामग्री, इमारती, कारखाने, रस्ते



आदींमधील कायमस्वरूपी गुंतवणूक ही विकासाची सुरुवात असते. त्याखेरीज विकास होणे अशक्य. विकसनशील देशांमध्ये विकसित होण्यापूर्वीच्या काळात अशा गुंतवणुकीचे प्रमाण जास्त असावे, उपभोगाचे प्रमाण कमी असावे. सन २०२३मध्ये भारतामध्ये गुंतवणुकीचे प्रमाण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ४२ टक्के होते; तर त्याच वर्षी चीनमध्ये गुंतवणुकीचे प्रमाण ६२ टक्के होते. (गुगल : दि हिंदू २० मे २४). चीनने ही काळजी अगदी सुरुवातीपासूनच घेतली आहे. असो. आता आपल्याला वेगवान विकासासाठी खासगी गुंतवणुकीची नितांत गरज आहे. तथापि खासगी गुंतवणुकीचा प्रतिसाद अजूनही पुरेसा उत्साहवर्धक नाही, हे लक्षात घ्यायला हवे. सरकारने पायाभूत सोयीसाठी ११ लाख कोटी रुपयांची तरतूद म्हणजेच, गुंतवणूक केली आहे. तसेच खासगी क्षेत्रासाठी कर कमी केले नसले (मात्र एंजल टॅक्स गेला. परदेशी कंपन्यांना कर सवलत मिळाली.) (उदा. कॉर्पोरेशन टॅक्स) तरी नवीन उद्योग सुरू केल्यास तेथील नवीन कामगारांना स्टायपेंड, भविष्य निर्वाह निधी आदी काही वर्षे देण्याची तरतूद अर्थसंकल्पामध्ये केली आहे. एकप्रकारे कामगारांचे पगार सरकार देईल. या सर्वांचा फायदा खासगी क्षेत्र घेईल आणि मग त्यातून गुंतवणूक वाढेल, असे मानता येईल.

करांचे दर आणि व्याप्ती : जलद आर्थिक विकास साधण्यासाठी उद्योजक आणि इतर जनता यांच्यावर जे विविध कर सरकार लागू करते त्यांचे दर कमी करावेत, मात्र त्याचवेळी करांची व्याप्ती वाढवावी. दर कमी पण जाळे विस्तृत! याच दिशेने गेली काही वर्षे सरकारचा प्रयत्न आहे. या अर्थसंकल्पामध्ये विविध करांचे दर वाढविणे, कमी करणे इ. सर्वांची गोळाबेरीज केल्यानंतर सरकारने सात हजार कोटी रुपयांचा महसूल (जो मिळाला असता तो) सोडून दिला आहे. ही एका अर्थाने सवलतच आहे. या धोरणाचे सुपरिणाम दिसत आहेत. प्रत्येक वर्षी सरकारचा कर महसूल अंदाजापेक्षा जास्त होत आहे. उदा. २२–२३ मध्ये हा महसूल साधारण २४ लाख कोटी रु. होता, तो २३–२४ मध्ये (सुधारित अंदाज) २७ लाख कोटी रु., तर अर्थसंकल्पामध्ये ३१ लाख कोटी आहे. प्राप्तिकराचा महसूल उत्तम प्रकारे वाढत असून त्याचा वाटा एकूण महसुलामध्ये २३–२४ ते २४–२५ यामध्ये १६ टक्क्यांवरून १९ टक्के (कॉर्पोरेट टॅक्सपेक्षा) जास्त झाला आहे. करसंकलनाबाबतची उमेद देखील वाढते आहे. या सगळ्याच गोष्टी निश्चितच स्वागतार्ह आहेत. जलद विकासासाठी याचा नक्कीच उपयोग होईल (सं. बिझनेस स्टँडर्ड, दि. २२ जुलै २४).

महागाई नियंत्रण : देशाला भेडसावणारा एक मोठा प्रश्न म्हणजे महागाई हा होय. महागाईच्या या राक्षसाला आवर घालण्यासाठी सरकारने अर्थसंकल्पामध्ये प्रयत्न केल्याचे दिसत आहे. महागाईमध्ये सर्वांत मोठी भर घालणारा घटक म्हणजे सरकारची वित्तीय तूट. सरकारने ही तूट ५.१ टक्क्यांवरून कमी करून ४.९ टक्के इतकी ठेवली आहे. म्हणजे साधारण १६ लाख कोटी. महसुली तूट तर फक्त सहा लाख कोटी रुपये आहे. (१.८ टक्के) वित्तीय तूट २२–२३ मधील १७ लाख कोटीवरून २४–२५ साठी १६ लाख कोटी रुपयांपर्यंत कमी झाली आहे. तूट कमी करण्यामध्ये आणि वित्तीय शिस्त लावण्यामध्ये सरकारची कामगिरी वाईट नाही. यामुळे महागाईस आळा बसू शकेल. तसेच गोरगरिबांना महागाईचा चटका निदान सुसह्य व्हावा यासाठी मोफत धान्य वितरण व्यवस्था चालूच असेल.अर्थसंकल्पाची वरील चारही वैशिष्ट्ये जलद विकास साधण्यासाठी पोषक आणि आवश्यक आहेत. सरकारने या अर्थसंकल्पामध्ये विकास साधण्यास सर्वोच्च प्राधान्य दिलेले आहे. कराचे दर कमी, गुंतवणुकीस उत्तेजन, अधिक राष्ट्रीय उत्पादन, अधिक रोजगार, पुन्हा अधिक महसूल, पुन्हा गुंतवणूक असे एक सुष्टचक्र त्यामुळे सुरू होईल. विकास घडून आल्यास सामान्य–असामान्य अशा सर्वांचाच फायदा होऊ शकेल. समुद्राच्या भरतीमध्ये सर्वच बोटी वर उचलल्या जातात, तसेच येथेही घडेल. मग या वर्गाला काय दिले, त्या वर्गाला काय मिळाले ही चर्चा थांबेल. विकसित भारताच्या दिशेने एक पाऊल पुढे पडेल.

# वेळ द्या, नाते बांधा...

आपल्या कुटुंबातील सदस्यांची सगळे जण काळजी घेत असतात. मात्र, आपल्या कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तींना म्हणजेच पालकांना गुणवत्तापूर्ण वेळ देणे हीसुद्धा त्यांची महत्त्वपूर्ण गरज असते. सहवास, स्पर्श व सकस, पारदर्शक संवादाने नात्यांचे साकव बांधले जातात व नाती जोपासलीही जातात. मात्र, आज घडाळ्याच्या काट्यांवर धावणारी कुटुंबे, आपल्या कुटुंबातील पालकांशी दैनंदिन स्तरावरील संवादास योग्य तो न्याय देऊ शकत नाहीत, हे चित्र ठळकपणे सर्वत्र दिसून येते. नोकरी–व्यवसायाच्या वेळा व उर्वरित वेळांत टीव्ही, सोशल मीडिया, मोबाइल यात रमलेल्या सदस्यांना, कुटुंबातील ज्येष्ठ सदस्यांच्या नेमक्या गरजांचा अनेकदा विसर पडतो; म्हणूनच आसाम सरकारने पालकांसाठी वेळ देण्याबाबत सुट्टीचा घेतलेला निर्णय महत्त्वाचा वाटतो.

आपल्या कुटुंबातील वयस्कर आई–वडिलांच्या मुलभूत गरजा (अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य व सुरक्षा) भागवल्या म्हणजे आपले कर्तव्य पार पडले, असे अनेकांना वाटते; परंतु वाढत्या वयातील आपल्या आई–वडिलांच्या या पलीकडेही काही गरजा असतात, याचे भान ठेवण्यास उद्युक्त करणारी एक घोषणा आसाम सरकारने नुकतीच केली आहे. आयुष्याला वळण लावणारे, सकस मूल्ये व चांगल्या संस्काराने आपल्या मनाची मशागत करणाऱ्या आई–वडिलांचे वय वाढत असताना त्यांना गुणवत्तापूर्ण वेळ देणे, त्यांच्याशी रोज संवाद साधणे, त्यांचे शांतपणे ऐकणे, त्यांच्या जवळ नुसते बसणे, स्पर्शातून त्यांना आश्वासक भावनिक आधार देणे ही गरज अधोरेखित करत ही घोषणा करण्यात आली आहे. आसाम राज्यातील सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना सात ते नऊ नोव्हेंबर २०२४ रोजी ‘विशेष सुट्टी’ जाहीर करण्यात आली आहे. मुख्य म्हणजे, या तीन दिवसीय सुट्टीचा लाभ हा आपल्या पालकांसह गुणवत्तापूर्ण वेळ घालविण्यासाठी व्हावा, असा मोठा विचार या घोषणेमागे आहे. विशेष म्हणजे ‘पालक’ या व्याख्येत सासू –सासरे हे नातेही अंतर्भूत करण्यात आले आहे. अर्थातच ही विशेष सुट्टी पालकांसह ‘एकत्र कुटुंबात’ राहणाऱ्या मुला– मुलींकरीता जाहीर करण्यात आली आहे.

ापल्या कुटुंबियांना गुणवत्तापूर्ण वेळ देणे म्हणजे काय तर, त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधणे, त्यांच्या भावनिक मानसिक गरजा ओळखून त्या भागवणे असा त्याचा थेट अर्थ होतो. संवाद हे आपल्या भाव–भावनांच्या प्रकटीकरणाचे उत्तम माध्यम असते. संवादातूनच आपल्याला समोरच्या व्यक्तीच्या मनातील नेमके म्हणणे लक्षात येते. परस्परांमधील ‘संवाद’ हा आपल्या सगळ्यांच्या जगण्यातील महत्त्वाचा घटक असतो. मुख्य म्हणजे, हा संवाद, आपली मानसिक –भावनिक गरज भागवत असतो; शिवाय आपल्या जगण्यातील उर्मीही वाढवत असतो. आज नेमके याचपासून आपले पालक वंचित राहत आहेत का, याचा विचार करायला हवा.वय वाढत असताना, आपल्या वयस्कर पालकांमध्ये (काही वेळा वाढत्या वयामुळे आलेल्या एकटेपणातून किंवा सामाजिक जीवनापासून लांब राहिल्यामुळे) असुरक्षिततेची भावना निर्माण होत असते. मुलांचा नित्य सहवास व संवाद या दोन गोष्टी मात्र यावर उत्तम मात्रा ठरतात. अर्थातच अशा घोषणा होत असताना, त्या ‘दिनविशेष’ म्हणून साजऱ्या होण्याची दाट शक्यता असते. जसे महिला दिन, बालक दिन इ. बहुदा उद्या उर्वरित अनेक राज्ये अशा घोषणा करण्यात पुढाकार घेतीलही; पण आपल्या कुटुंबात राहणाऱ्या आपल्याच पालकांकरीता वर्षातील तीन दिवस येथे नक्कीच अपेक्षित नाहीत. अशा घोषणा आपल्याला आपल्या जबाबदाऱ्यांचे भान निर्माण करतात, अशा दृष्टीने याकडे पाहणे आवश्यक आहे. या घोषणेच्या निमित्ताने पालकांना आपल्या सहवासाची, त्यांना गुणवत्तापूर्ण वेळ देण्याची व मुख्य म्हणजे त्यांच्याशी सहज संवादाची गरज असते हे प्रत्येक कुटुंबाला जाणीव करून देईल हे नक्की.

आज घडाळ्याच्या काट्यांवर धावतानाही, अनेक मुले–मुली आपल्या पालकांना, त्यांच्या कामकाजाच्या व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून फोन, व्हिडिओ कॉल करून दैनंदिन स्तरावरील संवाद साधताना



दिसतात, त्यांची विचारपूस करत असतात. मुख्य म्हणजे, त्यांच्या सर्व हालचालींवर लक्ष ठेवून असतात. त्यांच्या सोईसाठी सुयोग्य व्यवस्थाही लावत असतात. मात्र, हा पाठपुरावा व संवादासह सहवास, त्यांच्या दैनंदिन जीवनातील विविध व्यवहारात सहभाग देणे व त्यांच्यासाठी वेळ राखून ठेवणे या घोषणेमागील हेतू आहे. या निमित्ताने आपणही आपल्या पालकांसाठी व्यस्त वेळापत्रकातून वेळ कसा देऊ शकतो याचा विचार प्राधान्यक्रमाने करण्याची सवय लावून घेतली पाहिजे.

परदेशात ‘थॅंक्स् गिव्हिंग’ दिन/सप्ताह साजरा करण्याची पद्धत आहे. या निमित्ताने पालकांना भेटा, एकमेकांना गुणवत्तापूर्ण वेळ द्या, त्यांचे ऐका, त्यांच्याशी बोला, त्याच्या प्रती विविध पद्धतीने कृतज्ञता व्यक्त करा, असा हेतू या संकल्पनेत असतो. संबंधित देशातील प्रशासनामार्फत या निमित्ताने सुट्ट्या/ वेळांमध्ये शिथिलताही जाहीर केल्या जातात. दैनंदिन जीवनात आपल्या मदत करणाऱ्या सगळ्यांचेच आभार मानायचे असतात. मात्र, ‘आई–वडील आपलेच आहेत,’ असे म्हणत, त्यांना गृहित धरून दुर्लक्ष करणे अयोग्यच आहे.

खरे तर, आपण त्यांचे आपल्या जडणघडणीतील समर्पण, कष्ट व त्याग याचे स्मरण पदोपदी करणे आवश्यक आहे. मुख्य म्हणजे, भारतीय मानसिकतेतून कुटुंबव्यवस्थेकडे पाहिल्यास, पालक वयस्कर होत असताना, ते मुला–मुलींची जबाबदारी असतात हे विसरून चालणार नाही; त्यामुळे आपल्याला आपल्या पालकांना गुणवत्तापूर्ण वेळ देण्यासाठी असे दिन, घोषणा अथवा निमित्त शोधावी लागतात हे कुटुंबव्यवस्थेच्या दृष्टीने भविष्यकाळातील आव्हानांचे संकेत तर नाहीत ना, याचा विचार गांभीर्याने करणे आवश्यक आहे.नित्यनेमाने पालकांना, देवदर्शन, पर्यटन, करमणूक, सामाजिक कौटुंबिक एकत्रीकरणात घेऊन जाणारे मुले–मुली हे निमित्त साधत त्यांना वेळ, सहवास व त्यांचे म्हणणे ऐकण्यासाठी निमित्त साधत असतात. घरात जमलेली गप्पांची मैफल, एकत्र सणवार–उत्सव साजरे करताना, पालककेंद्रित दृष्टिकोन ठेवत केलेली वर्तणूक रचना या गोष्टी पालकांसाठी गुणवत्तापूर्ण सहवास देण्याची निमित्त असतात. आयुष्याची तिन्हीसांज ही प्रत्येकासाठी थोडे नैराश्य, स्वतःतील एकटेपण व आपली माणसे सोडून जाण्याचे भय निर्माण करणारी असते. या वयाच्या टप्प्यात अनेकदा या व्यक्ती अस्थिर व अस्वस्थ होवू लागतात; त्यामुळे एखाद्या लहान मुलासारखे त्यांचे संगोपन संयम ठेवत करणे आवश्यक असते.वयस्कर पालकांना वेळ देणे हे त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचे असते. आपल्याला वेळ देणारी, आपले म्हणणे ऐकणारी आपली मुले आहेत; मुख्य म्हणजे आपण भावी पिढीला हवे आहोत ही भावना या प्रक्रियेतून त्यांच्या आरोग्यवर्धनात मोलाची भूमिका बजावते. कुटुंबातील परस्परांमधील संवादातून स्नेह व एकमेकांच्या गरजा ओळखण्याची प्रक्रिया ही निरंतर चालत राहते.

चला तर मग, या घोषणेच्या निमित्त का होईना, आपणही आपल्या व्यग्रतेची गती थोडी नियंत्रित करत, आपल्या पालकांची अधिक डोळसपणे, गुणवत्तापूर्वक वेळ देत काळजी घेऊ. पालकांच्या डोळ्यांत या सहवासाचा, स्पर्शाचा व समृद्ध संवादाचा आनंद रोज वाचू या.

# गायरान धारकांच्या हर एक प्रश्नांचे निराकरन कायदेशीररित्या-सरवदे

## गायरान धाराकांच्या पाठीशी आम्ही खंबीरपणे उभा आहोत-खंडू जाधव,दिलीप माने, बाळासाहेब गायकवाड

**बीड | प्रतिनिधी**

तब्बल वीस ते तीस वर्षापासून गायरान जमिनी कसणाऱ्या गोरगरीब दलित शोषित पीडित मागास वर्गातील लोकांच्या पोटापाण्याचा प्रश्न मिटवणाऱ्या गायरान जमिनी बळजबरीने हस्तांतरित करून त्यावरती सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात आलेले आहेत.बीड जिल्ह्यामध्ये हे सर्रासपणे चालू आहे.संबंधित सरपंचाला हाताखाली धरून लोकांवर दबाव आणून त्यांच्या सह्या घेतल्या जातं आहेत. दलितांना दबावतंत्र वापरून होत असलेली गोरगरिबांची लूट थांबवा असे आव्हाहन गोर गरीब दलित पिढीतांसाठी काम करणारे सामाजिक कार्यकर्ते डॉ.जितीन वंजारे खालापूरीकर यांनी केले आहे. जिल्ह्यात अनेक सामाजिक कार्यकर्ते राजकीय नेते याला वेळोवेळी विरोध करत असूनही शासन प्रशासनाकडून याची दखल घेत नाही त्यामुळे गोरगरीबांवर अन्याय होत आहे.कमर्शियल बेस वरती विद्युत प्रकल्प उभारून शासनाची गायरान जमीन जी की गोरगरिबांना देऊ केलेली आहे ती गोरगरिबांच्या तोंडातून हिसकावून घेऊन गोरगरीब दलित शोषित पिडितांना त्या जमिनीचा उपभोग न देता संबंधित जमीन अगदी मोफत सौर ऊर्जा प्रकल्पामध्ये कोण देत आहे? बळजबरी सह्या घेऊन गावाची जमीन विद्युत विभागाला ग्रामपंचायत का वर्ग करत आहे? दबावतंत्र वापरून गोरगरिबांच्या सह्या घेऊन गायरान जमिनी का दिल्या जातं आहेत? याला कोण जबाबदार आहे? त्या मोबदल्यात संबंधित गायरान धारकांना कुठल्या प्रकारचा मोबदला दिला गेला आहे की नाही? हे येथील शासन प्रशासनाने पाहणं महत्त्वाचं आहे. परंतु सर्रासपणे गावातील सरपंच व काही खाजगी लोक गुंड गोरगरिबांना दंडेलशाही, दाप दडपशाही आणि दहशत निर्माण करून सर्रासपणे जमिनी हस्तांतरित केल्या जातात.काही गावगुंडांच्या मदतीने ही जमीन गोरगरिबांकडून हस्तांतरित करून घेतली जात आहे आणि त्यावरती सौर ऊर्जा प्रकल्प उभारले जात आहेत गोरगरिबांना खाण्यासाठी अन्नधान्य पीकवण्यासाठी शासनाने दिलेल्या गायरान जमिनीचा कमर्शियल विद्युत सौर ऊर्जा प्रकल्प चालवण्यासाठी उपयोग केला जात आहे हे निंदनीय गोष्ट असून यावरती योग्य ती कार्यवाही येथील जिल्हाधिकारी साहेबांनी करावी असे आव्हान सामाजिक कार्यकर्ते डॉ.जितीन वंजारे खालापुरीकर यांनी केले आहे.दिनांक २७ जुलै २०२५ रोजी गायरान हक्क अधिकारांसाठी जिजामाता चौक शिरूर कासार या ठिकाणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आढावा बैठक घेतली गेली यात वंचित चे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, सामाजिक कार्यकर्ते व स्व जमीन हक्क परिषदेचे



मराठवाला प्रवक्ते डॉ.जितीन वंजारे,महासचिव खंडू नाना जाधव, शहराध्यक्ष लखन जोगदंड, शिरूर तालुकाध्यक्ष दिलीप माने, पडोदा तालुकाध्यक्ष बाळासाहेब गायकवाड, सचिन यंकुळे, चंदू औसरमल, यांच्या नियोजनात टाकलेल्या शिरूर कासार येथील बैठकीत डॉ.जितीन वंजारे यांनी जिल्हाध्यक्ष यांना निवेदन देऊन तालुक्यातील अनेक गायरान जमीन कसणाऱ्या लोकांच्या व्यथा मांडल्या. त्यावर येणाऱ्या ३० तारखेला पाटोदा येथे प्रदेशाध्यक्ष प्रा. किसण चव्हाण सरांच्या मार्गदर्शनाखाली मोठी बैठक होणार असून त्यात सर्व विषयांवर चर्चा होणार आहे.गायरान धारकांचे हक्क अधिकार आणि त्यांची लाटलेली जमीन वापस देऊ, त्या जमिनीला कायदेशीर नावे लावून घेऊ असेही यावेळी जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी म्हटले तसेच खालापूरी येथे झालेल्या बेकायदेशीर सौर ऊर्जा प्रकल्पला दलितांच्या गायरान जमिनी कोणी व का दिल्या? दलितांचे हक्क का हिरावून घेतेले त्या संबधी विशेष चळवळ उभी करू असेही यावेळी ते म्हणाले आणि संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांना अनेक पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन गायरान धारकांच्या समस्या दूर करणार असल्याचे यावेळी जिल्हाध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते डॉ.जितीन वंजारे, दिलीप माने, खंडू जाधव, बाळासाहेब गायकवाड यांनी सांगितले.या बैठकीला सर्व पदाधिकारी व वंचितचे कार्यकर्ते त्याचप्रमाणे तालुक्यातील अनेक गायरानधारक बंधू-भगिनी उपस्थित होते.यावेळी वंचित चे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, सामाजिक कार्यकर्ते व स्व जमीन हक्क परिषदेचे मराठवाडा प्रवक्ते डॉ.जितीन वंजारे, महासचिव खंडू जाधव, शिरूर निरीक्षक राजेशकुमार जोगदंड,बीड शहराध्यक्ष लखन जोगदंड, , शिरूर तालुकाध्यक्ष दिलीप माने, पाटोदा तालुकाध्यक्ष बाळासाहेब गायकवाड, सचिव सचिन यंकुळे, उपाध्यक्ष मनोहर औसरमल, मा जी उपाध्यक्ष चंदू औसरमल, शहराध्यक्ष लक्ष्मण गायकवाड, ता उपाध्यक्ष वैजिनाथ खाडे,संजू लोंढे, लक्ष्मण लोंढे, नवनाथ लोंढे,कचरू लोंढे, वैजिनाथ लोंढे, युवराज लोंढे, सखाराम लोंढे, धनंजय लोंढे, अंबादास लोंढे, ज्ञानोबा लोंढे,अमोल लोंढे अर्जुन लोंढे, दगडू लोंढे, सुखदेव लोंढे, गोविंद यादव,शीतल देवकते, जालिंदर रंधवे,मोहन मैदल, विजय वाल्हेकर इत्यादीसह अनेक कार्यकर्ते उपास्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलीप माने, सूत्रसंचालन मनोहर औसरमल तर आभार प्रदर्शन सचिन यंकुळे यांनी केले.

# दिंद्रुडचा कोतवाल शुभम बनला राज्य राखीव पोलीस दलातील जवान, संजीवनी पतसंस्थेथ दिंद्रुड येथे सत्कार

**वडवणी | प्रतिनिधी**

नऊ वर्ष महसूल मंडळात कोतवाल म्हणून काम केले, पोलीस दलात जाण्याची आईची इच्छा पूर्ण करण्यासाठी बंद खोलीत अभ्यास केला, रात्रंदिन अंग मेहनत घेतली, शेवटी फळ मिळाले आणि दिंद्रुड चा कोतवाल शुभम राज्य राखीव पोलीस दलातील जवान झाला.

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड नजदीक असलेल्या चोपनवाडी हे शुभम काटेचे गाव आहे. घरची परिस्थिती प्रचंड हालाखीची, आई सविता या आशा वर्कर तर वडील मुकुंद हे शेतात काम करतात. नऊ वर्षांपासून शुभमने कोतवाल म्हणून दिंद्रुड तलाठी सज्जात काम केले.राज्यराखीव पोलीस दलातील मामाची प्रेरणा घेत मला ही पोलीस व्हावे हि आईची इच्छा पुर्ण करायची



होती.त्यासाठी गेल्या ४ वर्षांपासून कोतवाल हि जवाबदारी पार पाडत अभ्यास व प्रचंड अंग मेहनत घेतली. दिंद्रुड सज्जाचे तलाठी प्रमोद चव्हाण सह आई वडिलांनी प्रोत्साहन दिले या बळावर शुभम काटे ची राज्य राखीव पोलीस दलातील जवान म्हणून प्रशिक्षणासाठी ७ ऑक्टोबर २०२४ रोजी निवड झाली.राज्य राखीव पोलीस बल प्रशिक्षण केंद्र नानवीज,दौंड येथे नुकतेच प्रशिक्षण पुर्ण झाले. यापुढे राज्य राखीव पोलीस बलात सशस्त्र पोलीस शिपाई म्हणून काम करताना आता आई-वडिलांची व जनतेची सेवा करायला मिळणार याचा आनंद असल्याची शुभम काटे सांगतो.शुभमचा या बद्दल संजीवनी मल्टीस्टेट येथे संस्थेचे सचिव संजयजी सपाटे साहेब व त्यांच्या टीमने सत्कार केला.

**माझा मुलगा शुभम मेहनती व प्रामाणिक आहे, त्याची पोलीस होण्याची जिद्द शेवटी पूर्ण झाली. आता तो देशात नागरिकांची सेवा करेल याचा आनंद आहे. भविष्यात मोठा अधिकारी व्हावा हेच माझे स्वप्न आहे.**
**-सविता मुकंद काटे,आई**

**शुभम काटे हा कोतवाल असताना सांगितलेले कामे प्रमाणिकपणे पूर्ण करणारा, ध्येय पूर्ण करण्यासाठी चिकाटीने अभ्यास करणारा तसेच दिंद्रुड महसूल सज्जाचा होतकरू कर्मचारी होता.त्याची एसआरपीत भरती झाल्याचा आनंद आहे.**
**-प्रमोद चव्हाण, तलाठी दिंद्रुड सज्जा**

# साई पारायण सेवा आणि श्रद्धेचा संगमः डॉ. सुजय विखे पाटील

**शिर्डी (प्रतिनिधी)**

शिर्डी येथे सुरू असलेल्या साई सच्चरित पारायण सोहळ्याला डॉ. सुजय विखे पाटील यांनी भेट दिली. १००० रूमजवळ भक्तिमय वातावरणात पारायणाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या पवित्र सोहळ्यात त्यांनी साई महाराजांचे प्रवचन करणाऱ्या पूज्य महाराजांचे मनोभावे दर्शन घेतले.या पारायण सोहळ्याचे आयोजन श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, नाट्य रसिक मंच शिर्डी व स्थानिक ग्रामस्थांच्या सहकार्याने करण्यात आले असून, ही सामूहिक सेवा आणि श्रद्धेची एक सुंदर अभिव्यक्ती आहे, असे मत डॉ. विखे पाटील यांनी यावेळी व्यक्त.

डॉ. विखे पाटील यांनी भाविक भक्तांसमवेत भारतीय बैठक लावून प्रसाद ग्रहण करताना, या क्षणाला सेवा आणि श्रद्धेचा संगम असे सांगितले. यावेळी विखे पाटील परिवाराच्या वतीने पारायण सोहळ्यासाठी एक लाख रुपयांची देणगी आयोजक समितीकडे सुपूर्त करण्यात आली.यावेळी डॉ. विखे पाटील यांनी ऑक्टोबर महिन्यात शिर्डीत होणाऱ्या प्रदीप मिश्रा महाराज यांच्या आगामी कार्यक्रमाची रूपरेषा लवकरच जाहीर होईल, अशी माहिती देखील दिली. तसेच त्यांनी आग्रहाने आवाहन केले की, या पावन कार्यासाठी स्वयंसेवक म्हणून काम करण्याची इच्छा असलेल्या स्वयंसेवकांनी आमच्याशी संपर्क साधावा.या पवित्र पारायण सोहळ्यात हजारो भाविकांनी भक्तिभावाने सहभाग दर्शविल्याने परिसर अतिशय भक्तिमय, ऊर्जा आणि एकात्मतेने भारलेला दिसत होता. श्री साई बाबांच्या चरणी मन मोकळं करणाऱ्या या सोहळ्याने प्रत्येकाच्या हृदयात अनमोल स्मृती आणि नवचैतन्य पसरवले. यावेळी अभय शेळके पाटील, भाजपा अध्यक्ष रवींद्र गोंदकर, ताराचंद कोते तसेच शिर्डी ग्रामस्थ आणि भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नाशिकमधून ३०० किमी बीआरएम सायकल राईडला प्रारंभ

## दिव्यांग व्यक्तीसह राईड पूर्ण करण्याचे आव्हान!

**नाशिक | प्रतिनिधी**

नाशिकच्या निमाणी पंचवटी येथून आज पहाटे ६ वाजता १५ सायकलस्वारांनी ३०० किलोमीटरच्या ब्रेव्हेट्स डी रँडोनियर्स मॉन्डियाक्स (बीआरएम) सायकल राईडला सुरुवात केली. या राईडमध्ये विशेष बाब म्हणजे, एका दिव्यांग रायडरसह टॅन्डम सायकलवर दोन रायडर्स हे आव्हानात्मक अंतर पूर्ण करणार आहेत. या राईडमध्ये पेनव माटा, जे दृष्टिहीन रायडर आहेत, आणि त्यांचे पायलट पुरुश्रुत खिलारी यांनी टॅन्डम सायकलवर हे ३०० किलोमीटरचे अंतर पार करण्याचे आव्हान स्वीकारले आहे. या जोडीने अवघड रस्त्यांवर आणि सह्याद्रीच्या खोऱ्यांतून जाणाऱ्या मार्गावर २० तासांत हे अंतर पूर्ण करण्याचे ध्येय ठेवले आहे. या राईडचा मार्ग नाशिकपासून कसारा, डोलखांब, मोरोशी, माळशेज घाट, आळेफाटा, संगमनेर आणि परत नाशिक असा आहे. हा रस्ता खूपच चढ-उताराचा असून, सह्याद्रीच्या नयनरम्य पर्वतरांगांतून आणि दऱ्याखोऱ्यांतून जातो. पावसाळी हवामानामुळे रायडर्सना संपूर्ण प्रवास पावसातच करावा लागणार आहे, ज्यामुळे हे आव्हान आणखी कठीण बनले आहे.या राईडमध्ये इतर १३ रायडर्समध्ये एकमेव महिला रायडर लता रविचंद्रन यांच्यासह डीसीपी संजय बारकुंड, डीसीपी प्रशांत बच्छाव, डॉ. भानुदास आरोटे, डॉ. नीरज कोलगे, नानासाहेब पवार, मंजुनाथ पिसोत्रे, प्रशांत वाबळे, सचिन पाटील, सचिन पुंड, सचिन शेळके, दिलीप गुरुळे आणि अमित वैद्य यांचा समावेश आहे. हर्षल पवार बॅकअप कारमधून मार्शलिंगची जबाबदारी पार पाडणार आहेत.

# पैसे दुप्पट करण्याच्या मोहाने बदलापूरच्या तरुणीची तब्बल ३४ लाखांची फसवणूक

**बदलापूर | प्रतिनिधी**

गेल्या काही वर्षांत गुंतवणुकीच्या नावाखाली लाखो रुपयांची फसवणूक झाल्याचे अनेक प्रकार समोर आले आहेत. सुरुवातीला समाज माध्यम खात्यांवर काम देण्याच्या नावाखाली पैसे मिळण्याचे अमिष दाखवले जात होते. त्यानंतर शेअर बाजारात गुंतवणुकीची अमिषे दाखवली जाऊ लागली. ऑनलाईन ॲप आणि संकेतस्थळांच्या माध्यमातून पैसे गुंतवण्याचे आवाहन करत फसवणूक होत आहे. पोलिसांनी अशा अविश्वासार्ह माध्यमांतून आणि अवास्तव मोबदल्याचे आश्वासन देणाऱ्या योजनांना बळी न पडण्याचे वारंवार आवाहन केलेले असतानाही फसवणुकीचे प्रकार थांबलेले नाहीत.

बदलापूरात अशाच प्रकारचा एक सायबर गुन्हा समोर आला आहे. १० जून २०२५ ते १४ जुलै २०२५ या कालावधीत एका महिलेने तक्रारदार तरुणी व तिच्या पतीशी संपर्क साधून यूबीएस ट्रेडिंग कंपनीत पैसे गुंतवल्यास दोन महिन्यांत दुप्पट परतावा मिळेल, असे अमिष दाखवले. त्यानंतर आरोपी महिलेने तक्रारदाराला लिंक पाठवून 'यूबीएस' नावाचे ॲप डाउनलोड करण्यास सांगितले. वेगवेगळ्या तारखांना आरोपीच्या दिलेल्या बँक खात्यात व युपीआय आयडीवरून आरटीजीएस आणि फोनपेच्या माध्यमातून तक्रारदाराने एकूण ३० लाख ५३ हजार रुपये जमा केले.

त्यानंतर तक्रारदाराने यूबीएस ॲपमधून पैसे काढण्याची (विड्रॉल) मागणी केली असता आरोपीने कर भरावा लागेल असे सांगून ४ लाख ९९८ रुपये आणखी घेतले. मात्र त्यानंतर आरोपीने तक्रारदाराचे यूबीएस खाते बंद केले. त्यामुळे तक्रारदाराची एकूण ३४ लाख ५३ हजार ९९९ रुपयांची फसवणूक झाली.तक्रारदाराने तत्काळ सायबर गुन्हे शाखेच्या संकेतस्थळावर तक्रार नोंदवली. त्यानंतर बदलापूर पूर्व पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

# महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना आधार विसंगतींचा फटका बसणार नाही : केंद्र सरकारचे आश्वासन

## खा.प्रतिभा धानोरकर यांनी लोकसभेत उपस्थित केला महत्त्वाचा मुद्दा

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

महाराष्ट्र तसेच देशभरातील सरकारी आणि खासगी शाळांमधील नामांकित विद्यार्थ्यांच्या आधार कार्डमधील विसंगती आणि अवैध आधार कार्डच्या संदर्भात खासदार प्रतिभा धानोरकर यांनी लोकसभेत शिक्षण मंत्रालयाकडून स्पष्टीकरण मागितले. लोकसभा सचिवालयाला सादर केलेल्या अतारांकित प्रश्न क्रमांक १३३३ वर शिक्षण मंत्रालयातील राज्यमंत्री जयंत चौधरी यांनी महाराष्ट्रातील शालेय विद्यार्थ्यांच्या आधार नोंदणी आणि पडताळणी स्थितीची सविस्तर माहिती दिली.

सरकारच्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रातील १,८४,८९,०९२ विद्यार्थ्यांपैकी ४,५५,२६३ विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड नाही, तर ६,८०,६८६ विद्यार्थ्यांची आधार पडताळणी प्रलंबित आहे. २,०८,९०३ विद्यार्थ्यांची पडताळणी अयशस्वी झाली असून १,७१,४४,२४० विद्यार्थ्यांची आधार पडताळणी यशस्वी झाली आहे. यापैकी १,७०,३६,५९६ आधार पूर्णपणे सत्यापित झाले आहेत.

सरकारने स्पष्ट केले की पडताळणी अयशस्वी होण्याची प्रमुख कारणे म्हणजे नाव, स्पेलिंग, जन्मतारीख यांमधील विसंगती, आधार कार्ड अद्ययावत नसणे, जन्मतारीख नसणे, राज्याच्या सरल पोर्टलवरील नोंदीतील चुका आणि लिंग विसंगती आदी आहेत.

शिक्षण मंत्रालयाने खात्री दिली की आधार संबंधित विसंगतीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याला योजनांचा किंवा शिष्यवृत्तीचा लाभ नाकारला



जाणार नाही. समग्र शिक्षा, पीएम-पोषण यांसारख्या केंद्र पुरस्कृत योजनांचा प्रत्येक पात्र विद्यार्थ्याला लाभ मिळावा, यासाठी सरकार कटिबद्ध आहे.

सरकारने या विसंगती दूर करण्यासाठी विविध पावले उचलली आहेत. आधार नोंदणी व दुरुस्तीचे काम ब्लॉक आणि क्लस्टर स्तरावर सतत सुरू आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक ब्लॉकमध्ये आधारसंबंधी कामकाजासाठी दोन आधार किट उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच राज्ये व प्रकल्प मूल्यमापन मंडळ ( पीएबी ) यांच्यासोबतच्या त्रैमासिक बैठकीत येणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी मार्गदर्शन केले जाते.

खासदार प्रतिभा धानोरकर यांनी सरकारच्या उत्तरावर समाधान व्यक्त करताना सांगितले की, आधार विसंगतींमुळे कोणताही विद्यार्थी शैक्षणिक किंवा आर्थिक लाभापासून वंचित राहणार नाही याची खात्री करणे आवश्यक आहे.

# दिव्यात अनधिकृत बांधकामावर हतोडा



**ठाणे | प्रतिनिधी**

दिवा प्रभाग समितीच्या अतिक्रमण विभागाच्या पथकाने आज अनधिकृत बांधकामावर कारवाईचा बडगा उगारला आहे. ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरव राव यांच्या आदेशानुसार परिमंडळ १ कडून सदरची कारवाई दिवा प्रभाग समितीचे सहायक आयुक्त शिवप्रसाद नागरगोजे यांनी दिवा शहरातील प्रभाग २७ मध्ये कारवाई केली आहे. दिवा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त शिवप्रसाद नागरगोजे यांच्या नेतृत्वाखाली आज अतिक्रमण विभागाच्या पथकाने आज दिनांक २९ जुलै २०२५ रोजी दिवा प्रभाग समितीच्या प्रभाग क्र. २७ मधील दिवा-आगासन रोडवरील सिद्धिविनायक गेट समोरील अनधिकृत बांधकाम सुरु असलेल्या इमारतीचे ग्यास कटरच्या सहाय्याने अनेक स्ल्याप ग्यास कटरने तोडण्यात आले. सदरची कारवाई शिवप्रसाद नागरगोजे सहाय्यक आयुक्त सो. दिवा प्रभाग समिती यांचे उपस्थितीत व मार्गदर्शनखाली यंत्रसामुग्री सहायाने पोलीस बंदोबस्तात अनधिकृत बांधकामावर कारवाई पोलीस बंदोबस्तत कारवाई करण्यात आली.


# साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जन्मोत्सवास हजारोच्या संख्येने उपस्थित रहा

## मानवी हक्क अभियान कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड.बाळासाहेब आंबेडकर तर उद्घाटक प्रा.डॉ.मिलिंद आवाड याची प्रमुख उपस्थिती

**माजलगाव । प्रतिनिधी**

तळागाळातील समाजातील तरुणांनी डॉक्टर, वकील, पोलीस, कलेक्टर झाले पाहिजे ही संकल्पना उराशी बाळगून समस्त दलित चळवळीच्या एकेकाळी पाठीचा कणा राहिलेल्या दिवंगत कर्मवीर एकनाथरावजी (जीजा) आवाड यांच्या विचार धारेचा समाज घडविण्याचा वसा अंगीकृत करून समाजाला समविचारी विचार धारेशी जोडण्याचे काम करत असलेले मानवी हक्क अभियानचे अध्यक्ष प्रा.डॉ. मिलिंद आवाड यांच्या मार्गदर्शनाखाली मानवी हक्क अभियान बीड जिल्हा शाखा माजलगाव आयोजित *लोकशाहीर आणणाभाऊ साठे जन्मोत्सव सोहळा १ ऑगस्ट रोजी ठिक २ वाजता वैष्णवी मंगल कार्यालय माजलगाव येथे पार पडत आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर भूषवणार आहेत. तर उद्घाटक म्हणून दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे प्राध्यापक तथा मानवी हक्क अभियानचे अध्यक्ष डॉ. मिलिंद आवाड हे असणार आहेत.




या कार्यक्रमासाठी आमदार प्रकाश दादा सोळंके, मा.आ मोहनराव सोळंके , मा.आ. राधाकृष्ण होके पाटील , मा.आ. डी.के. देशमुख, मोहनराव जगताप, बाबुराव पोटभरे , ओमप्रकाश शेटे, जयसिंग सोळंके , जयदत्त नरवडे,सचिन उजगरे, उमेश काका मोगरेकर,प्रा.अर्जुन तनपुरे, नितीन दादा नाईकनवरे, श्रीहरी मोरे , सहाल भैय्या चाऊस, नानासाहेब घोडके, प्रभाकर साळेगावकर ,धम्मानंद साळवे, अरुणराव राऊत ,अविनाश तात्या जावळे , डॉ. ज्ञानेश्वर गिलबीले ,डॉ. प्रकाश आनंदगावकर, दयानंद स्वामी , शिवाजी सुतार, डॉ. दिनकर मस्के अरुण इंगळे, कचरु तात्या खळगे, मनमोहन कलंत्री ,कॉ. दत्ता डाके, तुकाराम येवले ॲड. तथागत कांबळे , मोहन जाधव ,गंगाभिषण थावरे,भिमराव नाडे,आंकुश जाधव,अजय शिंदे,विजय दादा साळवे,ॲड. नारायण गोले,भारत तांगडे ,ॲड. डोंगरदिवे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तरी या सोहळ्यास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मानवी हक्क अभियान बीड जिल्हा शाखा माजलगाव व जयंती महोत्सव समिती २०२५ आयोजक : राजेश क्षिरसागर, मधुकर कांबळे, रमेश गवळी, बंडु लोखंडे, बाबासाहेब थोरात, महादेव उमाप, कचरू कांबळे,पांडुरंग घडसिंगे, बंडु खंडागळे, संदिप वाघमारे, विष्णु मुजमूले, बबन खंडागळे, प्रल्हाद दळवी, छगन क्षिरसागर, आप्पाराव भारस्कर, राधे कांबळे, भारत जाधव, रमेश जाधव, आप्पाराव मुजमूले, किशन लोखंडे, परमेश्वर अडागळे, अनिकेत वाघमारे, कपिल अडागळे, बाबासाहेब मुजमूले, राहुल आवाड, प्रल्हाद कांबळे, राजेश थोरात, विनोद गायकवाड, तुळसीराम आवाड, अक्षय गवळी, महादेव अडागळे, अशोक थोरात, प्रकाश थोरात, बळीराम कारके, कपिल आडागळे, धोंडराम हातागळे, मारोती भिसे यांच्यावतीने आवाहन करण्यात आले आहे.

## ॲड.बाळासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या आण्णाभाऊ साठे जन्मोत्सवास मोठ्या संख्येने उपस्थित रहा–खंडू जाधव

**बीड । प्रतिनिधी**

तळागाळातील समाजातील तरुणांनी डॉक्टर, वकील, पोलीस, कलेक्टर झाले पाहिजे ही संकल्पना उराशी बाळगून समस्त दलित चळवळीच्या एकेकाळी पाठीचा कणा राहिलेल्या दिवंगत कर्मवीर एकनाथरावजी (जीजा) आवाड यांच्या विचार धारेचा समाज घडविण्याचा वसा अंगीकृत करून समाजाला समविचारी विचार धारेशी जोडण्याचे काम करत असलेले मानवी हक्क अभियानचे अध्यक्ष प्रा.डॉ. मिलिंद आवाड यांच्या मार्गदर्शनाखाली मानवी हक्क अभियान बीड जिल्हा शाखा माजलगाव आयोजित

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जन्मोत्सव सोहळा १ ऑगस्ट रोजी ठिक २ वाजता वैष्णवी मंगल कार्यालय माजलगाव येथे पार पडत आहे.




या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर भूषवणार आहेत. तर उद्घाटक म्हणून दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे प्रा. तथा मानवी हक्क अभियानचे अध्यक्ष डॉ. मिलिंद आवाड हे असणार आहेत.या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहा असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा महासचिव खंडू जाधव यांनी जाहीर आव्हान केली आहे.

## मोकाट जनावरां मुळे अपघात होण्याची शक्यता

# मोकाट जनावरे मेन रोड च्या मधुमद बसण्यामुळे वाहतूकीस अडथळ न.प.प्रशासनाने मोकाट जनावरां चा बंदोबस्त करावा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरातील मेन रोड यशवंतराव चौक राजीव गांधी चौक छत्रपती शिवाजी महाराज चौक व सावरकर चौक बस स्थानका कडे नेहमी वाहतूक वर्दळीच्या या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात मोकाट जनावरे वावरतात त्यामुळे रस्त्यावरून जाताना लहान मुले महिला पुरुष यांना खूप त्रास होतो. मोकाट जनावरे हे रस्त्याच्या मधोमध उभे राहतात तर कधी कधी रस्त्याच्या मधोमध बसतात त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो आणि रस्त्यावर वाहतूक कोंडी होते. मोकाट जनावराच्या कधीकधी झुंजही लागतात त्यामुळे महिला , पुरुष , शाळकरी मुलांना रस्त्यावरून जाताना जीव मोठी धरून चालावे लागते. रस्त्यावरील जनावरामुळे वाहतूक व्यवस्थेस खूप मोठी अडचण होते . तरी या जनावरचा बंदोबस्त करून जनावरांना कोंडवाड्या त टाकावे अशी मागणी नागरिक करत आहेत.सविस्तर वृत्त असे की अंबाजोगाई शहरांमध्ये प्रत्येक रस्त्यावर प्रत्येक गल्लीमध्ये मोकाट जनावरांचा जास्त प्रमाणात जमावं होतो आहे या जनावराच्या जमावंमुळे सर्वसामान्य नागरिक, शाळकरी मुले महिला यांना खूप त्रास होतो कधी कधी भर रस्त्यावर जनावरांची झुंज लागते यामुळे



शाळकरी मुलांना आपला जीव मुठीत घेऊन ये जा करावी लागते. मोकाट जनावरे भर रस्त्यावर बसतात यामुळे वाहतुकीची अडचण होते. अंबाजोगाई शहरातील मोंढा मार्केट मंगळवार आठवडी बाजार रविवार शुक्रवार या दिवशी खूप मोठा बाजार असल्यामुळे बाजारामध्ये मोठी गर्दी असते या गर्दीमध्ये सुद्धा मोकाट जनावरे बाजारामध्ये फिरतात यामुळे बाजार करणाऱ्या महिला पुरुषांना सुद्धा खूप त्रास होतो.तरी

नगरपरिषद प्रशासनाने मोकाट जनावरांचा बंदोबस्त करून जनावरांना कोंडवाड्यात टाकावे मोकाट जनावरे जास्त प्रमाणात वाढलेआहेत यामुळे नागरिकांना त्रास होतो हा त्रास होऊ नये यासाठी नगरपरिषद प्रशासनाने जनावरांना कोंडवाड्यात टाकून जनावरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी अंबाजोगाई शहरातील नागरीक करत आहेत

# रिपाई दिव्यांग आघाडी माजलगाव ता.अध्यक्षपदी गंगाराम निसर्गाध तर सचिवपदी गणेश घाटुळ

## पप्पू कागदे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात खा.रामदास आठवले केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री यांचे आदेशानुसार व पप्पू कागदे युवा रिपाई महाराष्ट्र अध्यक्ष व सुरेश माने दिव्यांग आघाडी अध्यक्ष महाराष्ट्र राज्य यांचे मार्गदर्शन खाली रिपाई दिव्यांग आघाडी माजलगाव तालुका अध्यक्षपदी गंगाराम निसर्गाध यांचीं तर सचिवपदी गणेश घाटुळ यांची जिल्हा अध्यक्ष शाहु (अप्पा ) डोळस यांनी रिपाई मध्यवर्ती कार्यालय बशीरगज बीड येथे पप्पू कागदे युवा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले ) यांचे प्रमुख उपस्तितीत त्यांचे हस्ते नूतन कार्यकर्ते यांचे पुष्पहार घालून दि. ३० जुलै २०२५ रोजी निवडीचे पत्र देण्यात आले.



त्यांचे सोबत जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड, प्रभाकर चांदणे,गणेश घाटुळ,जोगदंड,सुभाष तांगडे युवा तालुका अध्यक्ष बीड,गंगाराम निसर्गाध आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिव्यात महिला पोलिस अधिकारी नियुक्ती बाबत पोलीस आयुक्तांना निवेदन

## महिलांच्या अनेक तक्रारींमुळे भाजपच्या सपना भगत आक्रमक

**ठाणे । प्रतिनिधी**

वाढत्या लोकसंख्येच्या दिवा शहरात वाढत्या गुन्हेगारींच्या पार्श्वभूमीवर महिलांवरील अन्याय व अत्याचारांमुळे त्यांच्या तक्रारीची दखल घेण्यासाठी तात्काळ एक महिला अधिकारी व दोन महिला कर्मचारी नियुक्त करण्याची मागणी दिवा भाजप महिला मोर्च्याच्या अध्यक्षा सौ सपना रोशन भगत यांनी केली आहे. दिवा पोलीस चौकीत काही महिन्यापूर्वी महिला पोलिस अधिकाऱ्यांना बसण्यासाठी जागा नाही या कारणास्तव पुन्हा मुंब्रा पोलिस स्टेशन येथे नियुक्त करण्यात आले होते तरी ही खूप हास्यस्पद बाब आहे असे सपना भगत यांनी सांगितले आहे.

दिव्यात वाढती लोकसंख्या पाहता कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने महिलांवर होणाऱ्या अन्याय व तक्रारीसाठी महिला अधिकारी असने आवश्यक आहे. त्या दृष्टीने तात्काळ दिवा पोलिस चौकीत कायमस्वरूपी महिला पोलिस अधिकारी पुन्हा नियुक्ती करावी. नुकतीच दिव्यातील सुरेश नगर भागात महिलेवर अत्याचार करण्याचा प्रयत्न झाला होता याची तक्रार करण्यासाठी महीला रात्री १:३० वाजता पोलिस चौकीत गेली असता महिला पोलिस अधिकारी नसल्यामुळे तिची तक्रार घेतली नाही त्यावेळी तीला मुंब्रा पोलिस स्टेशनला जावे लागले. दिव्यातील महिलांना आपल्या तक्रारींच्या दृष्टीने तक्रारी मांडण्यासाठी महिला अधिकाऱ्याची अत्यंत गरज असून महिला वर्गातून कोणत्या ना कोणत्या खाजगी तक्रारी असतील तर त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो त्या अनुषंगाने दिवा पोलीस चौकीमध्ये महिला पोलीस अधिकारी व महिला पोलीस कर्मचाऱ्यांची तात्काळ व कायमस्वरूपी नियुक्ती करण्यात यावी असे दिवा भाजप महिला मोर्चाच्या अध्यक्षा सपना रोशन भगत यांनी बोलताना स्पष्ट केल आहे. प्रसंगी भाजपचे ठाणे जिल्हाध्यक्ष संदीप वाघुले, दिवा मंडळ अध्यक्ष सचिन भोईर, विजय भोईर, रोशन भगत, गणेश भगत, समीर चव्हाण आदी उपस्थित होते.

# रोग म्हशीला आणि इंजेक्शन पखालीला–छाया पांचाळ

## मृत्यू प्रकरणात चुकीच्या अधिकाऱ्यावर कारवाईचा आरोप

## न्यायासाठी सोमवारपासून आंदोलन–किष्किंधा पांचाळ, गणेश पांचाळ

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा रुग्णालयात प्रसुतीदरम्यान मृत्यूमुखी पडलेल्या छाया गणेश पांचाळ (वय २५, रा. आंबिलवडगाव, ता.जि. बीड) या महिलेच्या मृत्यू प्रकरणात मुख्य दोषींवर कारवाई टाळत मावशीवरच निलंबनाची कारवाई केल्याचा आरोप करत किष्किंधा पांचाळ (अध्यक्ष – विश्वकल्याण महिला सेवाभावी संस्था) आणि पती गणेश पांचाळ यांनी न्यायासाठी आंदोलनाचा इशारा दिला आहे.छायाबाई यांचा १३ एप्रिल २०२५ रोजी जिल्हा रुग्णालयात प्रसुतीनंतर अतिरक्तस्रावामुळे मृत्यू झाला होता. यासंदर्भात वैद्यकीय अधिकाऱ्यांची आणि नर्सची हलगर्जीपणा जबाबदार असल्याचा आरोप करण्यात आला असून मृत महिलेच्या भावाने पोलिस ठाण्यात लेखी तक्रार देत एफआयआर दाखलही केला आहे.




या प्रकरणाची चौकशी समिती नेमण्यात आली असून त्यानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचं सांगण्यात आलं होतं. मात्र चौकशी अहवालाच्या आधारे मुख्य दोषींना वाचवून फक्त मावशी रेखा कालिदास पवळे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरण रोग म्हशीला आणि इंजेक्शन पखालीला अशा प्रकारचं असल्याची टीका आंदोलकांनी केली आहे.जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत यांनी वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी नर्स यांना वाचवण्याचा प्रयत्न केला असून त्यामुळे त्यांच्यावरच प्रशासकीय कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच मयत छाया पांचाळ यांच्या कुटुंबीयांना आर्थिक २५ लाखाची मदत देण्याची मागणीही करण्यात आली आहे.या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ०४ ऑगस्ट रोजी (सोमवार) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर न्यायासाठी आंदोलन करण्यात येणार आहे, अशी माहिती किष्किंधा पांचाळ आणि गणेश पांचाळ यांनी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांना दिलेल्या निवेदनात नमूद केली आहे.

# केज–कळंब रोडवर बस दुचाकी अपघातात एक ठार एक जखमी

**केज । प्रतिनिधी**

शेगाव–पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावर केज तालुक्यातील सुर्डी फाटा येथे बस दुचाकी यांच्यात झालेल्या अपघातात दुचाकीवरील एक जण जागीच ठार झाला तर एक जण जखमी झाल्याची घटना बुधवारी (दि३०) दुपारी एक वाजेच्या सुमारास घडली. गणेश बंकट अंबिरकर असे ठार झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, गणेश बंकट अंबिरकर राहणार डिकसळ ता कळंब (वय ४०) आणि अब्बास शेरखान पठाण (वय ६०) मूळ रहिवाशीला लाखा ता केज (ह. मु. इस्लामपुरा कळंब)हे दोघे कळंब येथून सुर्डी येथील एका कार्यक्रमानिमित्त दुचाकीवरून (MH 25 z 34 63) निघाले होते. सुर्डी फाट्याजवळ आल्यानंतर सुर्डी कडे जाणाऱ्या रस्त्याकडे दुचाकी वळवली त्याचवेळी मागून पुणेहुन वसमत (MH 20 BL 5850) कडे जाणारी एसटी बसचा दुचाकींला धक्का लागून दुचाकीवरील दोघे खाली पडले.आणि बसचे मागील चाक गणेश अंबिरकर यांच्या डोक्यावरून गेले त्यामुळे त्यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला.तर अब्बास शेरखान पठाण हे जखमी झाले आहेत.दरम्यान,



अपघात होताच बस चालकाने बस युसुफवडगाव पोलीस ठाण्यात नेऊन लावली आणि अपघाताची माहिती दिली . युसुफवडगाव पोलीस ठाण्याचे स.पो.नी.मच्छिंद्रनाथ शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.ह.शेंडगे संपत व कोकाटे महेश यांनी अपघात स्थळाचा पंचनामा केला.त्यानंतर ॲम्ब्युलन्स ने गणेश अंबिरकर यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी कळंब येथील शासकीय रुग्णालयात पाठवून दिला. पुढील तपास पोलीस करत आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077